# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ

On the web: www.bmmonline.org

उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

सप्टेंबर २००७
वर्ष २७,अंक ९




सृष्टिनियंता प्राणदीपका प्रथमेशा मोरेश्वरा ।
त्रिगुणातीता विघ्ननाशका जगदीशा योगेश्वरा ॥
पार्वतीसुता गणनायका ज्ञानविज्ञान-सागरा ।
सिध्दिदेवता श्रीविनायका तुज वंदन ओंकारा ॥

**विनता कुलकर्णी**

# अध्यक्षीय

नमस्कार बंधुभगिनींनो,

हे वृत्त हातात पडत असताना सगळीकडे गणपती उत्सवाचे वारे जोरदार वाहात असतील. श्रावणातील सण-वार संपुन भाद्रपद केव्हा लागतो,उन्हाळ्याच्या सुव्या संपुन लेबर डे केव्हा उजाडतो व शाळा-कॉलेजेस केव्हा सुरू होतात हे न उलगडणारे कोडेच नाही का? तर मंडळी, या विघ्नहर्त्या गणपतीच्या आशिर्वादाने आणि तुम्हा सगळ्यांच्या पाठिंब्याने बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारणीने जोमाने कामास सुरूवात केली आहे.

गेल्या महिन्यात १६ ऑगस्टला फिलाडेल्फिआ मंडळाने पुढील अधिवेशनाच्या तयारीसाठी कार्यकर्त्यांची सभा आयोजित केली होती. त्यास बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे मी जातीने हजर होतो. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे एकूण शंभराहून अधिक कार्यकर्त्यांव्यतिरिक्त बृहन्महाराष्ट्र मंडळाचे तीन माजी अध्यक्षही या कार्यक्रमास हजर होते! कार्यकर्त्यांमधील उत्साह आणि उमेद बघता फिलाडेल्फियाचे अधिवेशन खुप जोरदार होणार हे मात्र निश्चित! श्री. मुकुंदरावजी कुटे यांची अधिवेशनाचे प्रमुख संयोजक म्हणून तसेच श्री. मंदार जोगळेकर आणि श्री. केदार गिध यांची संयुक्त संयोजक म्हणून निवड करण्यात आली. श्री. योगेश दाते हे अधिवेशनाचे खजिनदार म्हणून पद सांभाळतील. या सर्वांचे बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे हार्दिक अभिनंदन!

पुढील महिन्यात (ऑक्टोबर १३ आणि १४ तारखेस) फिलाडेल्फिआ मध्येच बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे "BMM-२०२०" ही शिखर परिषद भरविण्यात येत आहे. संस्थेने आतापर्यंत केलेल्या वाटचालीचा आढावा घेऊन पुढील दशकामध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाचे कार्य आणि कार्याची दिशा काय असावी हा या शिखर परिषदेमागील उद्देश आहे. आतापर्यंत झालेल्या अधिवेशनांचे संयोजक, बृहन्महाराष्ट्र मंडळाचे माजी अध्यक्ष, कार्यकर्ते, आणि महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष तसेच BMM प्रतिनिधी यांच्यातील वैचारिक देवाण-घेवाण अधिक बळकट व्हावी यासाठी सगळ्यांनाच निमंत्रण देण्यात आले आहे. केवळ अधिवेशनात घटकाभर (आणि तेही घाई-गडबडीत) होत असलेल्या मिटिंग्जपेक्षा मंडळाच्या इतिहासात प्रथमच भरत असलेल्या या दोन दिवसांच्या परिषदेपासून आपणासर्वांस निश्चितच फायदा होईल अशी मला खात्री वाटते.

याच परिसंवादात मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दोन नवीन उपक्रमांचे उद्घाटन होईल: १) मराठी उद्योजकांना एकत्र आणण्यासाठी North American Marathi Entrepreneurs (NAME); आणि २) राष्ट्रीय स्तरावर "बालविहार" कार्यक्रमाची सुरूवात. या दोन्ही उपक्रमांबद्दल आपणास अधिक माहिती हवी असल्यास किंवा या उपक्रमात भाग घ्यायचा असल्यास आपल्या BMM प्रतिनिधीकडे किंवा माझ्याशी जरूर संपर्क साधावा.

गणपती बाप्पा मोरया!


**गिरीश ठकार**
अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ
*gsthakar@gmail.com*


## या अंकात ......


| | |
|---|---|
| लेखनाचे आवाहन | पान २ |
| विविध मंडळांचे विभागीय प्रतिनिधी | पान ३ |
| बृ.मंडळाच्या २००९ च्या अधिवेशनाची वाटचाल | पान ३, ४ |
| श्रीगणेशयाग परिवार | पान ४ |
| मराठी मंडळांतून फेरफटका | पान ५ |
| परिचय: संध्या कर्णिक, अभिनंदन: सौ. दीपा ठाकूर | पान ६ |
| 'माझ्या आठवणीतील गणेशोत्सव' | पान ७ |
| हस्तांदोलन व हग्ज | पान ८,९ |
| पुस्तक परिचय | पान १० |
| शेवटचे पान | पान ११ |

# बृहन्महाराष्ट्र वृत्त


बृहन्महाराष्ट्रमंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)

**संस्थापक**
कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

**संपादक:** विनता कुलकर्णी

**सहाय्यक संपादक:** वसुधा पटवर्धन

**संपादन-सल्लागार:** मोहन रानडे , लीना देवधरे

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**
144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-800-300-6430 (EST)
E-mail: editorbmm@yahoo.com


वर्गणीचे दर

| | US | Canada | Other |
|---|---|---|---|
| वार्षिक: | $ 21 | $ 31 | $ 41 |
| द्वैवार्षिक: | $ 40 | $ 60 | $ 80 |
| आजीव: | $250 | $375 | $375 |

जाहिरातीचे दर

| | US | Can |
|---|---|---|
| पूर्ण पान: | $155 | $220 |
| अर्धे पान: | $ 85 | $115 |
| पाव पान: | $ 50 | $ 70 |
| अष्टमांश पान: | $ 35 | $ 40 |

- वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही
- लिखाणाच्या निवडीचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतीम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील
- पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल


**बृहन्महाराष्ट्रमंडळाची कार्यकारिणी (२००७-२००९)**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:** | गिरीश ठकार, | पिट्सबर्ग, पेन्सिल्व्हेनिया |
| **कार्यवाह:** | संदीप देवकुळे, | सॅन होसे, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष:** | आशिष चौघुले, | होकेसिन, डेलावेअर |
| **सभासद:** | लीना देवधरे, | टोरांटो, कॅनडा |
| | रिटा फ्रेंचमन, | नॅशव्हिल, टेनेसी |
| | किरण जोगळेकर, | फिलाडेल्फिया |
| | ललित महाडेश्वर, | रॅले नॉर्थ कॅरोलायना |
| | किशोर पाठारे, | ओर्लँडो, फ्लोरिडा |

**माजी अध्यक्ष:** जगदीश वासुदेव, प्रिन्सटन, न्यू जर्सी
**सल्लागार:** श्री ठाणेदार,सेंट लुईस, विद्या हर्डीकर सप्रे, लॉस एंजेलिस, मोहन रानडे, फिलाडेल्फिया
**MAIYTRA:** मैत्र प्रतिनिधी: नितिन सालकडे, फिलाडेल्फिया



**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्रमंडळ, उत्तर अमेरिका
196, Bryna Lane, Carnegie, PA 15106
gsthakar@gmail.com
www.bmmonline.org


# आवाहन

## वाचकांकडून पुढील अंकांसाठी
## लेख / कविता मागवत आहोत

कविता /लेखाची शब्द मर्यादा: ६०० शब्द.

**नोव्हेंबर :** दिवाळी अंकासाठी लेख, कविता, तसेच नोव्हेंबर व काही पुढील अंकांसाठी खालील विषयावर लेख/कविता:
अमराठी /अमेरिकन सून, जावई अशा नातेसंबंधातून आपणास आलेले गोड, कटू, विनोदी अनुभव, अमेरिकन विहीण / व्याही ह्यांच्याशी जमलेले सूत, वा कधीच न जुळलेले सूर, दोन्ही कुटुंबियांना कराव्या लागलेल्या तडजोडी.
अंकासाठी साहित्य खालीलपैकी एका पत्त्यावर पाठवावे:

**For sending electronic copy - <u>Email</u>** :

vinata@gmail.com
Or
vasudhapatwardhan@yahoo.com

**For sending paper copy :**

Vinata Kulkarni
23 - 1489 Heritage Way
Oakville ON L6M 4M6 Canada
Or
Vasudha Patwardhan
4708, Touchstone ter
Fremont, CA, 94555.


## जाहिरातदारांना सुवर्णसंधी
**नोव्हेंबर** दिवाळी अंकासाठी
पृष्ट २, ११ व पृष्ट १२ चे अर्धे पान
<u>रंगीत</u> जाहिरातीसाठी संपर्क:
Email: vinata@gmail.com
Phone : 905-842-6562


**वृत्त वर्गणी-नूतनीकरणासाठी संपर्क:**
1-800-300-6430
चेक पाठविण्यासाठी पत्ता :
144 Hope Road, Holland PA 18966

# विविध मंडळांचे विभागीय प्रतिनिधी

उत्तर अमेरिकेतील सर्व महाराष्ट्रमंडळांशी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या माध्यमातून वैचारिक देवाण घेवाण करणे व परस्पर संबंध अधिक दृढ करणे या उद्देशाने बृहन्मंडळाच्या समितीवरील सदस्य खालील प्रांतामधील वेगवेगळ्या मंडळांचे विभागीय प्रतिनिधीत्व (zonal representative) करीत आहेत.

सर्व महाराष्ट्रमंडळांचे अध्यक्ष, प्रतिनिधी तसेच बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सभासद यांनी बृ. मंडळाच्या विविध उपक्रमांबाबत मार्गदर्शन, विचार किंवा सूचना खालील विभागीय प्रतिनिधींना अवश्य कळवाव्यात.

| विभागीय प्रतिनिधी | विभाग व अंतर्गत मंडळे |
|---|---|
| **संदीप देवकुळे:** | बे एरिआ, ईस्ट बे, लॉस एंजेलिस, डेन्वर, फिनिक्स |
| **लीना देवधरे:** | टोरांटो, एडमंटन ,कॅलगरी, शिकागो, डेट्रॉइट |
| **रिटा फ्रेंचमन, गवाणकर:** | नॅशव्हिल, सेंट लुईस, डालस, ऑस्टीन, ह्यूस्टन |
| **ललित महाडेश्वर:** | रॅले, शार्लट, वॉशिंग्टन (DC), ॲटलांटा |
| **आशिष चौघुले:** | डेलावेअर, मिनिआपोलिस, मिल्वॉकी, कॅन्सास सिटी, सिन्सिनाटी, इंडियानापोलिस |
| **किरण जोगळेकर:** | फिलाडेल्फिया, न्यू जर्सी , न्यू यॉर्क, बॉस्टन |
| **किशोर पाठारे:** | ओर्लँडो, जॅक्सनव्हिल, टॅम्पा |
| **गिरीश ठकार:** | पिट्सबर्ग, क्लिवलॅन्ड कोलंबस, हॅरिसबर्ग, पोर्टलॅन्ड सिॲटल |

# २००९ च्या अधिवेशनाची वाटचाल

२००९ मधील बृहन्महाराष्ट्र अधिवेशन फिलाडेल्फियाला होणार याबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी व तयारीचा श्रीगणेशा म्हणून ११ ऑगस्ट रोजी एक सभा फिलाडेल्फियाच्या भारतीय मंदिरामध्ये आयोजित केली होती. या सभेला सुमारे १२५ लोक हजर होते

सभेच्या पहिल्या भागामध्ये फिलाडेल्फिया मराठी मंडळाच्या सर्वसाधारण सभेमध्ये मंडळाचे विश्वस्त श्री. अच्युत रत्नपारखी व सौ. माणिक लोथे यांनी संयोजन समितीच्या निवडीसाठी ठराव सादर केला. सर्वमतांनी ठराव संमत झाल्यानंतर संयोजन समितीची नियुक्ती झाली. या संयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांची नांवे या अंकात अध्यक्षीय स्तंभात घोषित केली आहेतच. अधिवेशनासाठी अभ्यासपूर्वक विस्तृत प्रस्ताव तयार करून आणि त्याला मान्यता मिळवून देण्यात ह्या संयोजन समितीवरील चौघांचा मोठा वाटा आहे.

यानंतर मध्यंतर. त्यावेळी चवदार जेवणाचा आस्वाद घेत सर्वजण, दुरून आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करीत होते. न्यू जर्सी, डेलावेअर व पेन्सिलवेनिया या भागातील अनेक उत्साही कार्यकर्ते या सभेसाठी २-३ तासांच्या अंतरावरून आले होते. अधिवेशनासाठी बोलावलेली बैठक ह्यानंतर सुरु झाली.

संयोजक, श्री. मुकुंद कुटे यांनी सर्वांचे स्वागत व प्रास्ताविक भाषणात आत्तापर्यंत झालेल्या घटनांचा व तयारीचा आढावा घेतला. सभेस उपस्थित बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री. गिरीश ठकार, तसेच माजी अध्यक्ष श्री. जगदीश वासुदेव, श्री. मोहन रानडे, सौ. शैला विद्वांस व BMM चे सभासद श्री. किरण जोगळेकर या सर्वांना व्यासपीठावर आमंत्रित करून त्यांचा अस्सल मराठी पद्धतीने केशरी फेटे घालून सत्कार करण्यात आला. बाहेर ढोल ताशांचा गजर चालूहोता. अश्या ह्या दिलखुलास सत्काराने, सर्वच भारावून गेले.

श्री. गिरीश ठकार, श्री. जगदीश वासुदेव व श्री. मोहन रानडे यांनीही आपल्या अनुभवाचा व सहकार्याचा पाठिंबा अधिवेशनाला राहील असे आश्वासन दिले. फंड-रेजिंग, हॉटेल रिझर्वेशन, इत्यादी विषयांवर चर्चा झाली. श्री. जगदीश वासुदेव यांनी फंड-रेजिंग मध्ये महत्वाची मदत करण्याची हमी दिली आहे. उपस्थितांच्या सर्वच प्रश्नांची समर्पक उत्तरे देवून संयोजन समितीने त्यांची ह्या विषयावरची चांगलीच तयारी झाली असल्याची चुणूक दाखवली. निष्ठावंत स्वयंसेवकांचे पथक तयार करणे हा या सभेचा मुख्य उद्देश होता आणि त्याला चांगलाच प्रतिसाद मिळाला. अधिवेशनाची वेबसाईट www.BMM2009Philadelphia.Org सुरू झाली असून त्यावर लवकरच विस्तृत माहिती उपलब्ध होईल असे कळते. एकंदर वातावरण अतिशय उत्साहपूर्ण व आनंदी होते. श्री. देवदत्त वडके यांनी ५००१ डॉलर्सची देणगी तिथल्या तिथे जाहीर केली. सुमा फुड्सच्या ढवळीकरांनी $१००१ ची देणगी दिली आहे. या आधीही सभासदांनी ४५-५० हजारांच्या देणग्यांची वचने दिली आहेत.

(कृपया पृष्ठ ४ पहा.)

## २००९ च्या अधिवेशनाची वाटचाल (पृष्ट ३ वरून पुढे)

असा हा सभा–सोहळा दुपारी १ ते ३ चालू होता. त्यानंतर ‘ रेस्टॉरंट ’ हा एक वेगळ्याच प्रकारचा अप्रतीम मराठी चित्रपट दाखविण्यात आला आणि कार्यक्रमाचे समारोपण झाले.

**अच्युत रत्नपारखी**
*ARatnapaarakhi@aol.com*

सभेतील काही क्षणाचित्रे ↓





**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
**जाहिरातीसाठी उत्तम माध्यम, माफक दर**

**COMFORT TRAVEL**
ARC **EDISON, NJ** IATA

**Alaska cruise & tour group leaving for 7 nights before & after BMM Convention**
**SOTC tours/Cox & Kings to Europe**
**eMail: comforttrvl@netscape.net or comforttrvl@yahoo.com**
**Please call - SHAILA SHIRVALKAR**
**TEL: 732-767-3135**
**FAX: 732-767-3138**

# श्रीगणेशयाग परिवार

आजच्या आधुनिक युगांत माणूस आपल्या रोजच्या धावपळीत, ऐहिक सुखात व मी पणात जखडून गेलेला दिसतो. ह्यातून थोडासा विरंगुळा मिळावा ह्या हेतूने, तसेच मन:शांतीसाठी आणि धार्मिक कार्याची जोपासना व्हावी या अंत:प्रेरणेने व श्री गणपती अथर्वशीर्षाच्या आवर्तनाच्या माध्यमातून होणाऱ्या आनंददायी अभिव्यक्तीचा सामुहिक स्वरूपात विस्तार व्हावा ह्या एकमेव प्रेरणेने काही तळमळीचे विचारवंत एकत्र आले व गणेशयाग परिवार ह्या धर्मादाय सेवाभावी संस्थेची स्थापना २००१ मध्ये कॅनडातील टोरांटोनगरीत झाली.

स्वातंत्र्यपूर्व काळात जनजागृती व संघटना हे दोन मुख्य हेतू साधण्यासाठी लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाची कांस धरून कॅनडासारख्या परदेशात हिंदूंना एका छत्राखाली संघटित करून लोकप्रबोधन करण्याचे व पारंपारिक उत्सवाला सांस्कृतिक वळण देण्याचे सामर्थ्य गणेशयाग परिवारात आहे. लोकोत्सवाची उदात्त व विधायक परंपरा चालू ठेवून अपप्रवृत्तींचा बीमोड करीत, नवनवीन संकल्पनांना मूर्त स्वरूप देऊन, कोणतेही शुल्क न आकारता मिळणाऱ्या देणग्यांतून व अनुदानातून परिवाराची यशस्वी घोडदौड आज सात वर्षे अखंड चालू आहे. सुनामी, गुजरात भूकंप,अशा नैसर्गिक आघातांमध्ये आपद्ग्रस्तांना मदतीचा हात देणारे, नि:स्वार्थी सेवेचे प्रतीक असलेले कार्यकर्ते ‘कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन’ या वचनानुसार सतत झटत असतात.

निधिसंकलनाचे उद्दिष्ट समोर ठेवून अलिकडेच ‘घराना’ हा दर्जेदार कार्यक्रम सादर करून नाविन्यपूर्ण कल्पनांतून रसिक मनाशी संवाद साधण्याची परंपरा परिवाराने कायम राखली. गायकीच्या चार घराण्यांचे प्रतिनिधित्व करणारे निपुण कलाकार होते: सौ. राजश्री करंदीकर, सौ. रमणीक सिंग, सौ. मौसमी रॉय व श्री नरेंद्र दातार. साथीला होते: घरंदाज तबलावादक श्री किशोर कुलकर्णी आणि संवादिनीवर श्रीयुत राया बिडये - (ज्यांनी पूर्वी जितेंद्र अभिषेकी, भीमसेन जोशी, सुधीर फडके अशा दिग्गजांना साथ दिली.) तसेच नवोदित कलाकार श्री पराग मराठे यांनी आपल्या हार्मोनियम वादनाने श्रोत्यांना आश्चर्याचा सुखद धक्का दिला. संपूर्ण कार्यक्रमाच्या आयोजनात गणेशयाग परिवाराच्या अनेक कार्यकर्त्यांचा मोलाचा वाटा होता.

आजच्या चंगळवादी जीवनात धार्मिक वृत्तीचा पाया रचून आधुनिकता व सांस्कृतिक वारसा यांची सांगड घालणाऱ्या ह्या संस्थेला उत्तरोत्तर असेच उदंड यश प्राप्त होवो हीच श्रीगणेशाच्या चरणी प्रार्थना!

**मिलिंद गोठोसकर**
*gmilind@rogers.com*

# मराठी मंडळांतून फेरफटाका

## मराठी भाषिक मंडळ, टोरांटो (कॅनडा)

### वार्षिक व प्रासंगिक कार्यक्रम २००७

मराठी भाषिक मंडळ, टोरांटो आयोजित यंदाचे वार्षिक व प्रासंगिक असे अनेक कार्यक्रम उत्साहाने पार पडले. १८ वे वार्षिक साहित्य संमेलन, वासंतिक, 'सूरलता' (सूर लय ताल)– संगीत संमेलन, डॉ. प्रकाश व डॉ. मंदाकिनी आमटे यांची प्रेरणादायी मुलाखत, श्रोत्यांच्या मनाशी संवाद साधणारा सुधीर गाडगीळांचा एकपात्री प्रयोग 'मुलखावेगळी माणसे', १ जुलै रोजी टोरांटो येथील ४० व्या '*कॅनडा डे परेड* ' मधे सालाबाद प्रमाणे सौ. सरिता कुकडे यांच्या उत्साही नेतृत्वाखाली ५५ मराठी बंधूभगिनींच्या लेझिम पथकाचे प्रात्यक्षिक, १५ जुलैचा क्रिकेट सामना व वार्षिक सहल, १०ते १२ ऑगस्ट Youth Camp असे विविधवयोगटांस वाव देणारे कार्यक्रम संपन्न झाले. आता वेध लागले आहेत श्रीगणेशाच्या आगमनाचे.

Chinguacousy Secondary High School, Brampton येथे शनिवार, २२ सप्टेंबर २००७ रोजी गणेशोत्सव आयोजिला आहे. दुपारी ३–४:३० नावनोंदणी, पूजा, दर्शन व प्रसाद, ४:३०–७:३० ६ ते १८ वर्षे वयोगटातील मुलामुलींनी सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम, ७:३०–८ गणेश विसर्जन व ८–९:३० सहभोजन -अशी कार्यक्रमाची रूपरेषा आहे. दरवर्षीप्रमाणे मंडळातील आबालवृध्द गणेशोत्सवात उत्साहाने सामील होतील ह्याबद्दल खात्री आहे.

**डॉ. विनता कुलकर्णी**
*vinata@gmail.com*

***

## फिलाडेल्फिया मराठी मंडळ

**सहल – ऑगस्ट २००७:** फिलाडेल्फिया मराठी मंडळाची सहल यंदा मार्श क्रीक लेकच्या रम्य परिसरात संपन्न झाली. उकाडा भयंकर होता, पण उपस्थितांचा उत्साह त्यामुळे मुळीच कमी झाला नाही. मुलांसाठी पासिंग द पार्सल, पिन्याटा, आणि चमचा–लिम्बू व धावणे अशा अनेक शर्यती ठेवण्यात आल्या होत्या. मोठ्या लोकानी तीन पायांची शर्यत, पोटॅटो सॅक शर्यत, क्रिकेट, बॅडमिंटन असे खेळ खेळून सहलीची रंगत वाढविली. सहल संपताना यंदाचे अध्यक्ष श्री. केदार गिध यांनी २००५–०७ ची कार्यकारी समिती विलीन झाल्याची घोषणा करून मंडळाची दारोमदार नविन समितीवर सोपविली. सर्वांनी जुन्या समितीने केलेल्या कामगिरीची वाखाणणी केली. मंडळाचे नवीन अध्यक्ष म्हणून श्री. श्रीकांत चौधरी यांची नेमणूक झाली आहे. त्यांनी ही नियुक्ती स्विकारताना, पुढचे मुख्य लक्ष्य बृ. मंडळाचे अधिवेशन राहणार असले तरी मंडळाचे इतर कार्यक्रम नेहमी प्रमाणे होत राहतील अशी हमी दिली. मंडळाचा पुढचा कार्यक्रम म्हणजे गणेशोत्सव सप्टेंबर १५–२५ होणार आहे.

**सुजाता देशमुख**
*srdeshmukh@hotmail.com*

## फिलाडेल्फिया गणेशोत्सव:
## १५–२५ सप्टेंबर २००७






फिलाडेल्फिया गणेशोत्सवाच्या कार्यक्रमाची रुपरेषा बृ. मंडळाच्या ऑगस्टच्या वृत्तपत्रात दिलेली आहेच. यंदा फिलाडेल्फिया गणेशाची आरास, सौ. सरिता कोतवाल ह्यांच्या नेतृत्वाखाली सौ. निलीमा कुटे, ममता पाटील, मीनल सामंत, गौतमी जोगळेकर व इतर १० जणींनी मागील २ महिने परिश्रमपूर्वक सजवली. खास पेणहून आणलेली गणरायाची मोठी मूर्ती मूषक रथामध्ये प्रतिष्ठापित होईल. नेहमीच्या प्रथेनुसार पहिल्या दिवशी, फिलाडेल्फिया मंडळाचे प्रसिद्ध ताशा वादक श्री. हर्षद अभ्यंकर ह्यांच्या ढोलताशाच्या तालावर नाचत गात, छत्र, चामर, भगवे झेंडे व अब्दागिरींच्या दिमाखामध्ये गणपतीची मिरवणूक निघेल. भारतीय विद्यालय आणि प्लिमथ बालविहार येथील विद्यार्थी मिरवणुकीमध्ये गणरायासमोर वेगवेगळे नृत्य सादर करणार आहेत.

फिलाडेल्फिया गणेश उत्सवाचे संस्थापक श्री. मुकुंद कुटे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली, यंदाच्या उत्सवाची धुरा श्री. गणेश पाटील, प्रमोद कोतवाल, कु. त्यागराज शारदा व विपुल राठोड हे सांभाळत आहेत. त्यांसोबत फिलाडेल्फिया मराठी मंडळाचे व इतर सहभागी संस्थांचे ७५ वर अधिक कार्यकर्ते मागील ३–४ महिन्यापासून झटत आहेत.

फिलाडेल्फिया गणेश उत्सवाचा एक विशेष गुण म्हणजे, केवळ मराठी माणसालाच नव्हे तर संपूर्ण भारतीय समाजाला हा महोत्सव एकत्र करतो आणि त्याच बरोबर अमेरिकन समाजासोबत देखील संवाद प्रस्थापित करण्यात तो यशस्वी झाला आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाने अनुभवसंपन्न झालेल्या अमेरिकेमधील इतरही मराठी मंडळांनी देखील स्थानिक मंदिरांच्या सहकार्याने असा उपक्रम करून पाहावा. या बाबतच्या मार्गदर्शनासाठी फिलाडेल्फिया गणेश उत्सवाचे संयोजक मंडळ उपलब्ध आहे.

**गणेश पाटील, फिलाडेल्फिया**

# संध्या कर्णिक



Bay area महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा म्हणून त्यानी काम केले आहे. १९९९ साली बे एरिआ येथे झालेल्या BMM convention मध्ये Master of Ceremony म्हणुन त्यांची निवड झाली होती. वसंत बापट, मंगेश पाडगावकर, सरोजिनी वैद्य, पु. ल. देशपांडे, दिलीप प्रभावळकर, अरूण दाते, गो. नी. दांडेकर, जयंत नारळीकर, न्यायमूर्ती धर्माधिकारी इत्यादी मंडळींचा गुरू, स्नेही, अतिथी म्हणून घरगुती सहवास मिळाला म्हणून त्या स्वतःला धन्य मानतात.

मागची सहा वर्षे Hospice मध्ये volunteer म्हणून त्या काम करतात. रुग्णांच्या घरच्यांना आधार म्हणून रुग्णांच्या घरी त्या respite visits देतात. To support the patient's family असे ह्या कामाचे स्वरुप असते. आणि हे काम अतिशय आनंदाने जवळ जवळ प्रत्येक weekend ला त्या करत असतात. Pro choice, pro-gray movement, pro women's liberation, anti-war ह्या सर्वांचा पुरस्कार त्या करतात. ग्रंथालय, युद्धविरोधी कार्यक्रमांमध्ये त्या सक्रीय सहभागी आहेत. त्यांना प्रवास, वाचन संगीत, पोहणे, जुनी हिंदी गाणी, सर्व तऱ्हेचे, सर्व भाषांमधले चित्रपट आवडतात. अमेरिकेत मोठं होता होता, त्या (चांगल्या अर्थाने) Indo-American झाल्या आहेत.

**वसुधा पटवर्धन**
*vasudhapatwardhan@yahoo.com*

सुमारे ३८ वर्षांपूर्वी जेव्हा घराघरांतून माणसे अमेरिकेत येत नव्हती तेव्हा संध्याताई प्रथम फिलाडेल्फियात आल्या. विमानतळावरून बाहेर आल्यावर स्वागताला १२-१३ इंच बर्फ़ वाट बघत होता. नंतर त्यांचे लग्न अमेरिकेत झाले. लग्नापूर्वी जोडीदाराबरोबर राहणे जी गोष्ट आजही अशक्य वाटते ती त्यांच्या बाबतीत त्या काळात घडली. प्रथम त्या गाडी चालवायला शिकुन स्वावलंबी बनल्या आणि लगेचच Villanova विद्यापीठात दाखल झाल्या. त्या तरुण (२० वर्षे) वयात मनात अपार कुतूहल होते, मनाची पाटी स्वच्छ होती, कोणतेही पूर्वग्रह नव्हते. ही जवळ असलेली मोठी शिदोरी घेऊनच त्यांनी पुढचा प्रवास सुरु केला. दोन मुलांचे संगोपन जाणीवपूर्वक घरी राहून केले. त्यांना सदैव नव्या प्रयोगांना सामोरे जायला उत्तेजन दिले आणि म्हणूनच आज दोन्ही मुले यशस्वी जीवन जगत आहेत. मग त्यांनी फिलाडेल्फियात १० वर्षे आणि फ्लोरिडात ४ वर्षे भारतीय मैत्रिणींचा (बहुतेक सगळ्या अमराठी) support group चालवला. वेगवेगळ्या विषयांवर चर्चा, वेगळे उपक्रम, अडचणीत असलेल्यांना मदत वगैरे कामांमध्ये त्यांनी सहभाग घेतला. इथूनच्या जीवनाबद्दल "सोबत" साप्ताहिकातून "अमेरिकन घर" म्हणून सदर लिहिले व प्रसिद्ध केले. पुढे कामगिरीचा प्रकल्प वाढवुन फिलाडेल्फियात महाराष्ट्र मंडळ सुरू करण्यात पुढाकार घेतला. फिलाडेल्फियात "शब्दांच्या संध्याकाळी" हा वार्षिक साहित्यिक कार्यक्रम सुरू केला. संध्याताईंची पुढे "दिवा कुणाचा तेवत राही" व "कुणास्तव कुणीतरी" ही दोन पुस्तके प्रसिद्ध झाली.

## अभिनंदन !!!

### Women of Excellence पुरस्काराने सौ. दीपा ठाकूर सन्मानित

ह्यूस्टन विभागात "immigration lawyer" म्हणून सुमारे दोनदशकें कार्यरत सौ. दीपा ठाकूर अनेक स्थानिक व सामाजिक संस्थांमधे नेतृत्व व मोलाचे कार्य करीत आहेत. Indo- American Chamber of Commerce चे अध्यक्षस्थानही त्यांनी भूषविले आहे.

भारताच्या ६०व्या स्वातंत्र्यदिनसोहोळाप्रसंगी, ह्यूस्टन येथील George R Brown Convention Center येथे सौ. दीपा ठाकूर यांना भारतीय सांस्कृतिक केंद्र (India Culture Centre – ICC) तर्फे Women of Excellence पुरस्काराने सन्मानित केल्या गेले. विविध क्षेत्रात असामान्य व मोलाची कामगिरी केलेल्या ज्या महिलांना ICC तर्फे हा पुरस्कार प्रदान केल्या गेला त्यामधे सौ. दीपा ठाकूर एकमेव महाराष्ट्रीयन महिला होत्या.

बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे सौ. दीपा ठाकूर यांचे अभिनंदन!

# माझ्या आठवणीतील गणेशोत्सव

श्रावण महिना सरत आला की वेध लागतात ते गणपतीचे! गणपतीचे आगमन हा सर्वोत्तम आनंदाचा सोहळा असतो. गणपतीची मूर्ती, फुले, दुर्वा, पत्री, चन्दन, अगरबत्त्या ह्याचा एक संमिश्र असा सुवास दरवळत असतो आणि त्यातच घरातील साजुक अन्नाचा सुवास. सगळ तन मन खर्चून गृहिणी स्वयंपाक बनवितात. असा हा अती आनंदाचा सण. आम्ही आमच्या वाडीत दरवर्षी सार्वजनिक गणपती बसवतो. त्याचा उत्साह तर इतका अफाट असतो की तरुण मुले, मुली, छोटी छोटी मुलं ही सर्व आनंदाने सहभागी होतात. सर्वांच्या मदतीने हा उत्सव दरवर्षी साजरा केला जातो. एकवर्षी काहीतरी आगळंवेगळं करायचं अशी सर्वांची इच्छा होती. त्यामुळे लहान मुलांनी, तरुणांनी, पुरुषांनी आणि बायकांनी आपआपला- असे वेगळेवेगळे स्वतंत्र कार्यक्रम बसवुन आधी कसलीही कल्पना न देता एक सरप्राईज असाच तो सादर करायचा, त्याशिवाय रोज रात्री जेवण एकत्र करायचं. पाच दिवसाच्या गणापतीचे सर्व दिवस खुप मजा करायची असं ठरलं.

दरवर्षीप्रमाणे पूजेला बसण्याचा मान नवविवाहित अगर त्यातल्या त्यात वयाने लहान दांपत्याला द्यायचा हे ठरलेलचं असे. त्यानंतर दणक्यात आरत्या, प्रसाद वाटप होत असे. त्या वर्षी गणपतीची आरास नेहमी पेक्षा जास्तच करायची ठरली होती. फुले, पताका, माळा, रंगीत दिव्यांचा लखलखाट करायचा असं सगळं ठरल्याप्रमाणे चतुर्थीला वाजत गाजत गणपतीचं आगमन झालं. यथासांग पुजा झाली आणि रात्री कार्यक्रमांना सुरवात झाली. कार्यक्रम काय असेल? सादरीकरण कसं होइल? याची सर्वांना उत्सुकता होती. आणि जी धमाल आली ती काही विचारु नका. मुलं चुकतमाकत नाटुकली, नाच, गरबा करीत होती. दुसऱ्या दिवशी तरुण मुलांमुलींचे नाटक, नकला, गाणी वगैरे झालं. तिसऱ्या दिवशी पुरुषांनी जो काही कार्यक्रम केला, तो नेमका काय होता ते त्यांच त्यांना तरी कळलं की नाही देव जाणे. सगळ्यांची हसता हसता पुरेवाट झाली. त्यामुळे एक आगळीच मजा आली. पण आम्हा बायकांचा कार्यक्रम मात्र खुप सुंदर झाला. कार्यक्रमासाठी आमच्यातल्या एका भगिनीने गाणे लिहिले होते. गाण्याला चालही तिनेच लावली. आम्ही प्रत्येक धर्माची एक एक स्त्री घेउन तिला तिचे पारंपारिक कपडे, दागिने घालायला सांगितले. मधोमध एक मुलगी भूमाता म्हणुन उभी राहिली. आणि तिच्या भोवती आम्ही भारताचा नकाशा दिसेल अशा पद्धतीने एकेक धर्माच्या स्त्रीला हातात दिवे लावलेले आरतीचे तबक देउन उभे करुन "आमचा भारत देश महान" हे गाणे म्हणुन सर्वांच्या मनात देश प्रेमाची जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रम फार सुंदर झाला. चार दिवस कसे गेले कळलं नाही.

विसर्जनाच्या दिवशी ठरवल्याप्रमाणे राणे आजोबा आजी हे वृद्ध दांपत्य उत्साहाने उत्तरपूजेसाठी तयार झाले. त्यांची कहाणी तशी हृद्यच आहे. त्यांचा मुलगा आणि सून यांचे एका अपघातात निधन झाले. एकुलत्या एक नातवाचे संगोपन त्यांनी उत्तम रीतीने केले. आणि त्याच्या दुराग्रही स्वभावामुळे तो तेव्हा सैन्यात दाखल झाला होता. उत्तरपूजेसाठी आजी अगदी नटून थटून- नथ, गोट, पाटल्या घालुन व पैठणी नेसून व आजोबा पण पितांबर नेसुन आले होते. आणि पूजेला सुरवात झाली. सगळे जण एकाग्रतेने पूजा पहात असतांनाच तारवाला आला. तिकडेच कुणीतरी तार घेतली आणि फोडुन वाचली, तर त्याच्यावर जणु आभाळच कोसळले. करता करता कुजबुज सुरु झाली आणि एक प्रचंड घाव प्रत्येकाच्या शिरावर पडला. आजोबांचा नातू लढता लढता धारातीर्थी पडला होता. पण त्यांना हे इतक्यात कळू नये याची सर्वांनी खबरदारी घेतली. पण दुःख कुणालाही आवरता येत नव्हतं. एकच सन्नाटा पसरला. पूजा यथासांग पार पडली. आजोबांनी मोठ्यांदा म्हट्ले "गणपती बाप्पा मोरया" आणि बाकीच्यांनी प्रतिसाद दिला. पण त्यात काही जीव नव्हता. तेव्हा ते ओरडले, “अरे मोठयांदी म्हणा, आवाज फुटत नाहीत काय?, तुमचे सगळ्यांचे चेहरे असे पडेल का दिसतात? गणपती जाणार म्हणुन का? अरे जन्माला येणारा माणुस कधीतरी मरणारच. पण हा देव आहे. पुढच्या वर्षी पुन्हा येणार आहे. चला उत्साहात विसर्जन करा.” आजोबांनी इतका उत्साह दाखवूनही काही उपयोग झाला नाही. मुकाव्यानेच विसर्जन झाले. स्वयंपाक तयार होता. जेवणाची इच्छाच नव्हती पण जेवण झाल्यावर आजोबांना सांगायचे असे ठरले. त्यामुळे त्या दडपणाखाली कुणाला धड जेवण जाईना. आजोबा सारखे आग्रह करीत होते. कशीबशी जेवणं उरकली. मागचे आवरले. सर्वजण खुर्चांवर बसले आणि नातवाच्या निधनाबद्दल आजोबांना कसे सांगायचे तेच कुणाला सुचेना. शेवटी आजोबा उठले. म्हणाले “गणपती आले आणि गेले पण जाताना एकटे गेले नाहीत. माझ्या एकुलत्या एक नातवाला बरोबर घेऊन गेले. माझा नातू चिरंजीव झाला. त्याला वीरमरण आले. अरे तुम्हाला काय वाटले मला माहित नव्हतं ? मी तारवाला पाहिला. तुमचे चेहरे, तुमची कुजबुज सर्व कानांनी टिपली. पण *शो मस्ट गो ऑन.* अरे आता मरेपर्यंत दुःख उगाळायचे आहेच. पण मला अभिमान वाटतो माझा नातू देशाच्या कामी आला.” आजी केव्हाच कोसळल्या होत्या. त्यांच्या तोंडातुन शब्दही बाहेर पडत नव्हता. त्यांना डॉक्टरांनी इंजेक्शन देऊन झोपवले. आजोबांच्या धीरोदात्त वागणुकींचे कौतुक करायचे की नशीबाला दोष द्यायचा हेच उपस्थितांना कळेनासे झाले. त्यानंतर आमची बदली झाली. ती वाडी आम्ही सोडली तरी तो गणेशोत्सव मी आजन्म विसरणार नाही.

**सौ. शालिनी तेंडुलकर**
Milpitas,CA
remiten@hotmail.com

# हस्तांदोलन व हग्ज

आपली मायभूमी सोडून सातासमुद्रापलिकडे आल्यावर आपण सर्वांनीच मायदेशीची काही वस्त्रे सोडून ठेवली व नव्या जगातली नवी वस्त्रेप्रावरणे धारण केली. साडी मंगळसूत्र जाऊन त्या जागी पॅण्ट ड्रेस बायका घालू लागल्या. पुरुषांच्या वेषात फारसा फरक पडला नाही. बहुतेकांच्या खाण्यापिण्यात मात्र पुष्कळच फरक पडला. चिकन बियर अगदी बायकाही पुरुषांच्या बरोबरीने खातात, पितात. दोन्ही जगातल्या चांगल्या गोष्टी घ्यायच्या व वाईट त्या सोडून द्यायच्या हा सर्वांचाच प्रयत्न असतो. फक्त चांगल्या काय व वाईट काय यावर बहुतेक वेळा एकमत नसतं. नेहमी दारुपान करणाऱ्यांनाही त्यांच्या मुलीनी नाच – अगदी भरतनाट्यम् सुध्दा शिकणे, वा स्टेजवर नाच करणे हे कमीपणाचे वाटते. तसंच काहींना पाश्चात्यपध्दतीप्रमाणे हस्तांदोलन करणे वा हग्ज देणे (मिठी मारणे) हे किळसवाणे वाटते. विशेषत: मराठी माणसांना दुसऱ्याविषयीच्या चांगल्या भावना शब्दातच काय कृतीनेही व्यक्त करणे अवघड असते.

दुसऱ्याविषयीचा जिव्हाळा आम्हाला आमच्या नजरेतूनच दाखवता येतो असा त्यांचा दावा असतो. त्यासाठी दुसऱ्याच्या घाणेरड्या हातांचा स्पर्श कशाला हवा/अन मग त्यातून नसते उपद्रवी जंतू आपल्या अंगावर चढले म्हणजे? ही त्यांची भीती असते. आपली भारतीय नमस्काराची पध्दतच कशी त्यापेक्षा उत्तम आहे हा त्यांचा ठेका असतो. भारतात जंतुचे किती साम्राज्य असते हे कोणाला नव्याने सांगायला नको,नाही का?

नमस्कार मग तो कोपरापासून केलेला नसेल तर केव्हाही चांगलाच! यात वाद नाही. नमस्कारातून आदराची भावना दाखवली जाते. पण प्रेमाची? तो वादाचा प्रश्न आहे. आमच्या लांबच्या एक काकू रोज न चुकता संध्याकाळी हात पाय धुवून घरातील सर्व वडिलधाऱ्यांना वाकून नमस्कार करीत. एकत्र कुटुंब असल्याने घरात त्यांचे आजे सासरे, दोन चुलत सासरे, सासवा वगैरेची रेलचेल होती. पण त्या हटत नसत. एरवी त्या कटू शब्द बोलण्यात, कुत्सितपणे हसुन लोकांची मने दुखवण्यात कुणाला हार न जाणाऱ्या होत्या. पण हा रोजचा नमस्कार त्यांना सर्व अपराधांची जणूं माफी देत असावा. आपण नमस्कार करतो तेव्हा खरं तर मला वाटतं आपण त्या माणासावर आपली केवढी तरी जबाबदारी टाकत असतो.

माझ्या लहानपणी माझ्या आईवडिलांनी माझ्या मनाविरुध्द कितीतरी लोकांना मला नमस्कार करायला लावला होता. ज्यांच्या विषयी आपल्याला आदर वाटतो, त्यांना आपणहून नमस्कार केला जातोच. पण ज्यांच्या विषयी आपल्या मनांत किंचितही आदराची भावना नाही अशांना देखल्या देवा दंडवत प्रमाणे नमस्कार घालून काय साधते देव जाणे!

की प्रेमाची भावना लोकांदेखत व्यक्त करणं हा गुन्हा ठरतो? भांडणातच खरं प्रेम असतं अशी बऱ्याच जणांची समजूत असते.

(कृपया पृष्ठ ९ पहा.)


**वाचकाचे मन पहिल्या पानापासून शेवटल्या पानापर्यंत खिळून ठेवणारे**
**व नंतर परत वाचण्यास उद्युक्त करणारे आत्मवृत्तपर पुस्तक**

**झाले मोकळे आकाश**

**पृष्ठसंख्या : ४७५, hard cover**

**किंमत : $ 12 (पोस्टेज व हॅंडलिंग सह)**

**लेखक: अशोक सूर्यवंशी**

**आत्मवृत्तास लाभलेले पुरस्कार व काही अभिप्राय :**

– आशीर्वाद पुरस्कार, वंदना प्रकाशन (मुंबई)
– शब्दगंध साहित्य पुरस्कार, अहमदनगर
– रूथबाई हिवाळे पुरस्कार, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर
– अकोला मराठी साहित्य पुरस्कार, अकोला

* " महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीने हे उत्स्फूर्त आणि प्रामाणिक आत्मवृत्त वाचावे " : गडाख पाटील, आमदार व खासदार, पुणें
* " महाराष्ट्र शैक्षणिक बोर्डाने या प्रामाणिक आत्मचरित्राचा अभ्यास करावा " : शिक्षणतज्ञ डॉ. न. म. जोशी, पुणे.
* *' मानव परिपूर्ण नाही. परिपूर्ण नसणे ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे पूर्णत्वाकडे जाण्यास मदत आणि स्फूर्ती मिळते.'* " या सूर्यवंशींच्या विचारात प्रचंड आशावाद दिसून येतो. एकंदरीत, ' झाले मोकळे आकाश ' हे पुस्तक म्हणजे अशोक सूर्यवंशीचे अनुभवसिध्द प्रामाणिक आत्मवृत्त ! " – डॉ. विनता कुलकर्णी, संपादिका बृहन्महाराष्ट्र वृत्त

**पुस्तक मागविण्याचा पत्ता:**
**171 Franklin Ave.**
**Maplewood N.J. 07040**

**अधिक माहिती साठी संपर्क:**
**Phone: 973-762-8012**
**Email: suryawanshi2000@hotmail.com**

# हस्तांदोलन व हग्ज

(पृष्ठ ८ वरून पुढे)

मला वाटतं भारतात व इथेही जी मंडळी पुण्यामुंबईसारख्या गच्च भरलेल्या शहरातून जेव्हा परत मराठी लोकांनी गच्च भरलेल्या शहरातून जेव्हा परत मराठी लोकांनी गच्च भरलेल्या अमेरिकेतल्या शहरात येतात, तेव्हा त्यांना मराठी लोकांचे व एकूणच माणसांचे अजीर्ण होत असावे. हस्तांदोलन वा मिठी – यातील हाताच्या वा काखेतल्या घामाव्यतिरिक्त – प्रेमाचा ओलावा त्यांच्या लक्षांतच येत नसावा. आपण मराठी माणसे तर दुरावा ठेवण्यात चांगले पटाईत असतो. मी बरा अणि माझे काम बरं! या धोरणात शेजारी कोण रहातं हे पण बिचाऱ्यांना ठाऊक नसतं.

आपल्या एकूणच रहाणीच्या सुरक्षिततेचा तर हा परिणाम नसेल? शिवाजी महाराजांनी महाराष्टात व महाराष्ट्राबाहेरही जो एक दबदबा निर्माण केला त्यामुळे व देशाच्या हद्दीपासून आपण लांब असल्याकारणाने विशेषत: पंजाबीलोकांना जो रोजच्या धकाधकीचा प्रश्न शेकडो वर्षे सोसावा लागला, तो आपल्याला वा भारतातील इतर कुठल्याच लोकांना लागला नाही. आपलं माणूस आज आहे तर उद्या असेल याची शाश्वती त्यांना नसावी. म्हणूनच उगवलेला दिवस व जवळ असलेल्या माणसाची किंमत त्यांना जास्त वाटत असावी. तेव्हा पंजाबी लोक येता जाता एकमेकाला मिथ्या मारतात यात नवल ते कसले? युरोपमध्येही दोन महायुध्दे झाल्याने पंजाबी लोकांप्रमाणे त्यांच्यातही मिथ्या मारण्याची पध्दत रूढ झाली असावी.

अशी परिस्थिती खरं तर आता मुंबईसारख्या शहरातूनपण निर्माण झाली आहे. अशावेळी घरातून बाहेर पडणाऱ्या माणसाला वा बरेच दिवसांनी भेटणाऱ्या नातलगाला, मित्र–मैत्रिणीला नुसतेच हात जोडून नमस्कार करण्या ऐवजी – तोही करावा, पण एक हलकीशी मिठी मारली तर त्यात काय चुकलं वा बिघडलं? मनुष्य वा कुठलाही प्राणी हा जात्याच स्पर्शाचा तहानलेला असतो. स्पर्श हा गुणवर्धक असतो. लहानपणी अंगावर वा बाटलीने फॉर्म्युला पाजतांना बाळाच्या डोक्यावरून आई हात फिरवत असते. दुधाबरोबरच आईचा बाळाला झालेला स्पर्श–त्यानेच ते मूल वाढत असते. माझ्या दोन्ही मुलींना मी अमेरिकेतही त्या दोन वर्षाच्या होईपर्यंत रोज खोबरेल तेलाने मसाज करून डाळीचं पीठ लावूनच आंघोळ घातलेली आहे. मसाज थेरपीतही मसूअरच्या हाताच्या प्रेमळ स्पर्शाने माणसाच्या मनालाही मसाज होत असतो.

कुत्रं, मांजर बाळगणाऱ्या लोकांची ह्रुदये, तब्येती या इतरांपेक्षा चांगल्या असतात असं सिध्द झालेलं आहे. माझ्या मुलीकडची तिची मांजरी काश्का (काश्कि ता हे रशियन भाषेतलं मांजराचं नाव) हक्काने माझ्या मांडीवर येऊन बसते. माझ्याजवळ झोपते. 'माऊ माऊ' करून आपलं लक्ष वेधून घेते. हो तिचे केस घरभर पडतात, ते स्वच्छ करावे लागते. सगळे कबुल आहे. पणा तिचा जो प्रेमळ सहवास मिळतो ना– त्याला मोल नाही. इतकं गोड मांजर मी कुठेच पाहिलं नाही. स्वच्छतेचे मेरुमणी असणाऱ्यांना अशा प्राण्यांचीही घाण वाटते. अशी माणसे बबलबॉय सारखी सतत त्यांच्या बुडबुड्या–तच रहातात की काय कोण जाणे? एवढं जंतुविरहित जीवन जगून त्यांची रोगप्रतिकार शक्ती किती कमी झालेली असेल, याची कल्पनाच केलेली बरी.

हस्तांदोलनात झालेल्या स्पर्शात, ते करतांना झालेल्या नजरभेटीत जन्माच्या गाठी बांधल्या जातात. नुसत्या फॉर्मल एक हाती हस्तांदोलना साठी दोन्ही हात जुळवुन एका हाताने दुसऱ्याच्या हातावर थोपटलेले हस्तांदोलन, हे माणासात जी जवळीक निर्माण करतं त्याला मोल नाही. मिठी मग ती हलकीशी असो वा घट्ट असो, होणाऱ्या स्पर्शातुन माणसाच्या मनाला मिळणारा दिलासा अवर्णनीय असतो.

सध्याच्या संगणकाच्या युगात जग जेवढं जवळ येत चाललं आहे तेवढाच माणूस एकमेकाला दुरावत चालला आहे. जेव्हाकेव्हा गाठीभेटी होतात तेव्हा नुसत्या नमस्काराऐवजी एक हस्तांदोलनातून वा मिठीतून दहा भेटींची भरपाई होते. आमच्या लहानपणी आमच्या आईनेही वयात आलेल्या आम्हा मुलींना स्वत:च्या भावांचा, वडिलांचा सुध्दा स्पर्श होणार नाही याची दक्षता घेतली होती. मग बाकीच्या मुलांची, पुरुषांची तर गोष्टच सोडा. स्वत:च्या बहिणींना, मैत्रिणींनाही मिठी मारण्याची आपल्यात पध्दत नाही. आईला मात्र मी न चुकता सकाळी उठल्या उठल्या, दात घासल्या घासल्या रोज मिठी मारत असे. तशा माझ्या मुलीही मला जाता येता मिठया मारत असतात. अमेरिकेत आल्यामुळे मात्र सुरवातीस दर पाच सहा वर्षांनी भारतभेटीचा योग येत असल्याने मी माझ्या बहिणींना, भावजयांना, नंतर नंतर मैत्रिणींनाही भेटायला गेल्यावर मिठया मारू लागले. आता माझे विद्यार्थीही मला बेधडक हग्ज देतात. कामावरच्या बरोबरीच्या एकेकट्या रहाणाऱ्या आम्ही बायकापण एकमेकीला आधार देतांना हलकीशी मिठी मारून दिलासा देतो. आपल्या भारतीय संस्कृतीत– विशेषत: स्त्री पुरुष संबंध हे फक्त लैंगिक संबंधापुरतेच मर्यादित राहिले आहेत. त्याबाहेरचे मैत्रीचे संबंधही असू शकतात, व त्यांची जोपासना करावी लागते ही गोष्टच लोकांना कल्पनेपलिकडे वाटते. हो अगदी अमेरिकेत चाळीस चाळीस वर्षे राहिलेल्यांना सुध्दा. कामावरचे अमेरिकन पुरुषसुध्दा मैत्रीच्या नात्याने मला हग्ज देतात, पण अजून मराठी,भारतीय बायका पुरुषातला हा दुरावा संपलेला नाही.

माझे वडील दिवंगत होऊन आता दोन वर्षे होतील. डिसेंबर २००५ मध्ये त्यांना भेटून सांगलीहून पुण्याला जातांना मला काय वाटले कोण जाणे, त्यांना नमस्कार केल्यावर मी उठून चक्क कडकडून मिठीच घातली. त्यांच्या खरखरीत दाढीचा स्पर्श अजूनही माझ्या उजव्या गालावर ताजा आहे. त्यानंतर ते गेले. पण काय सांगू? त्या एका मिठीतून मला एवढ्या वर्षातला त्यांचा जो सहवास मिळाला नव्हता ना,त्याची सगळी भरपाई झाल्यासारखी वाटली बघा!

**माधुरी बापट,** *थॅचर,ॲरिझोना*
*durga1950@hotmail.com*

# पुस्तक परिचय

**SHIVAJI- Hindu King in Islamic India**
**By James W. Lane,** Oxford University Press, 2003, 127pp, printed in USA. ISBN 0-19-514126-1

Prof Lane, an academic from Macalester College, visited Maharashtra numerous times and claims to have had an interest in Shivaji for almost two decades! I could find out how he got interested in Shivaji when a large majority of native born Americans, until recently ie 9/11/2001, hardly knew anything about any (one) or -(thing) outside the geographical boundaries. This is not just my opinion as a Naturalised US citizen but many of compatriots. I am a Maharashtrian Brahmin born and raised in Hyderabad which was the capital city of the erstwhile Nizam's Dominions from the 18th century till 1948 and of the state till it was disintegrated in 1956. The Nizam, a Moslem, is oft quoted by Lane in his account of history of Shivaji's exploits. I have been in the USA for almost half a century and have had some interest in the interactions of people with different backgrounds by way of religion or ethnicity. I have been an academic for about six decades (see eg www.wiley.com/borgaonkar). I read a commentary about Lane's book in the highly respected British science weekly magazine Nature and was interested in reading the book. The controversial account of it's publication and the reaction of Maharashtrians in Pune and other communities got me interested. A reading of the book gives me an impression that this author, Lane, has viewed the glory endowed by the Maharashtrians on Shivaji as an affront to the rule of Moslems in India in general, which somehow Lane feels justified. Military generals have credited Shivaji as the original inventor of 'Gurela fighting'.

It is disturbing for me to see in print a book that gives the readers a view that is obviously biased! Just as, for example, the Indians term the 1857 fights between the British and Indians as the 'First War of Independence' and Veer Savarkar has even written a tome about it. While the British termed it a 'mutiny'. Maharashtrians call Shivaji's kingdom a first Maharashtra State, while others such as Aurangzeb have even called him a 'mountain rat'. I am distressed by Lane's writings which further deepens the divide between Indian Moslems and Hindus in general. It is well known that Moslems of South Asia are not considered as equals by the Middle Eastern Arabs and there is hardly any difference between the Moslems of India and Pakistan, an unfortunate creation of the British in 1947. I call it unfortunate because it has permanently divided the Moslems of the subcontinent! The inhabitants of Pakistan feel threatened by the larger remaining part of British India where a large number Moslems inhabit. Bangladesh was formed to separate the poorer Eastern Pakistan by Indira Gandhi after she liberated, from the dominant Western Pakistanis, that part of the sub-continent.

No population likes to be ruled by another group. We in US rebelled and declared our own Independence in 1776. The British did not accept that for about 5 decades and kept on fighting their loss such as the burning of the White House in 1812! So, why view Shivaji's coronation as an affront to the Moslem rule in India! The British have very tactfully become our closest allies during the last 100 years and do not like to be reminded about their loss of the regions on the other side of the pond! Unfortunately whenever historical or political commentaries are made about Moslems in India and Pakistan the religious divide is glorified by adding fuel to the fire. Those of us who have lived our lives in mixed communities have learnt to forget the differences and get on with our lives. I urge all of us, especially writers of historical events should do that from now onwards!

**Digamber S. Borgaonkar, Ph.D.**
*11 Stabler Circle, Wilmington, DE 19807*




ह्या वृत्तपत्रासाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या मदत करणाऱ्यांचे, जाहिरातदारांचे, आणि वाचकांचे मन:पूर्वक आभार !

**बृहन्महाराष्ट्र वृत्त मुद्रक आणि वितरक :** दिलीप नामजोशी
Sir Speedy Printing, Blue Bell, PA

# शेवटचे पान

माझे नोकरीनिमित्त कॅलिफोर्नियाला बरेच वेळा जाणे होते. परंतु निसर्गसौंदर्याने संपन्न असलेल्या या राज्याची ओळख घाईघाईत भेट देऊन होत नाही म्हणून एका मित्राकडील लग्नसमारंभाच्या निमित्ताने सॅन डिएगोला जायचे ठरले तेव्हां पूर्वी न पाहिलेल्या तसेच पाहून अत्यंत आवडलेल्या ठिकाणांना जरा वेळ काढून भेट द्यायचे आम्ही ठरवले.

१९८० सालच्या सप्टेंबर महिन्यात यू. एस. नेव्ही मधे मी नोकरीला लागलो. नोव्हेंबर महिन्यात जिमी कार्टरचा पराभव करून रोनाल्ड रेगन अध्यक्ष झाले त्यावेळी ते ७० वर्षाचे होते म्हणजे निवृत्त होऊन आराम करण्याचे ते वय. तरीही अध्यक्षपदाचा ध्यास त्या वयात घेऊन कम्युनिझमच्या पाडावाचे स्वप्न पूर्ण करण्यास त्यांनी अविश्रांत मेहेनत घेतली. ती ८ वर्षे, १९८१ ते ८८ हा कालखंड, माझ्या नोकरीच्या कारकीर्दीतील उत्तम काळ. अध्यक्ष रेगन यांच्या 'शक्तीतून शांतता' या सूत्रामुळे अमेरिकेच्या संरक्षण खात्याचे बजेट प्रचंड प्रमाणात वाढले व त्यामुळे अनेक नविन प्रॉजेक्टवर काम करण्याची मला संधी मिळाली व त्यातून बरेच शिकता आले. त्याचबरोबर सत्तरी गाठलेले रेगन एका ध्येयाने प्रेरित होऊन तरूणांना लाजवतील अशा उत्साहाने काम करताना पाहण्याची संधी मिळाली. बृ. मंडळाची स्थापना १९८१ सालची. मंडळाच्या कार्यात भाग घेण्याची स्फूर्ती मला त्यावेळच्या वातावरणामुळे मिळाली. माझ्या स्वतःच्या कंपनीची स्थापनाही त्यावेळचीच. म्हणून सिमी व्हॅली येथील रेगन ग्रंथालयाचे उदघाटन झाल्यापासून आणि विशेषतः रेगनच्या मृत्युनंतर मला या ग्रंथालयाला भेट देण्याची इच्छा होती.

रेगन अध्यक्ष असताना सुट्टीचा वेळ त्यांच्या सॅन्टा बार्बारा येथील रॅन्चवर व्यतीत करीत. एकूणच त्यांना निसर्गाची आवड होती. म्हणून तेथून जवळच असलेल्या सिमी व्हॅली येथील निसर्गरम्य डोंगरावरील १०० एकराच्या परिसरात रेगन ग्रंथालय व संग्रहालय बांधले आहे. भरपूर सूर्यप्रकाश, लांब व्हांडे, प्रशस्त लॉन्स यामुळे सर्व परिसर देखणा झाला आहे. त्याची बांधणीही रॅन्चवरील घरासारखीच आहे. व्हाईट हाऊसमधील ओव्हल ऑफिसची प्रतिकृती, बर्लिन भिंतीचा एक तुकडा, अण्वस्त्राचे मॉडेल, आणि अध्यक्ष असताना रेगन दररोज रोजनिशी लिहित असत त्यातील काही पाने हे सर्व पाहताना तो आठ वर्षाचा काळ डोळ्यासमोर उभा राहत होता. रेगन वापरत असत ते बोईंग ७०७ विमान (एअर फोर्स वन), त्यांचे हेलिकॉप्टर (मरिन वन) व बुलेट प्रूफ लिमोझिन सुद्धा या संग्रहालयात पाहण्यास मिळते. रेगनच्या मृत्युनंतर त्यांची समाधी याच जागेवर बांधण्यात आली. 'सर्व मानवजात जन्मतः स्वभावाने चांगलीच असते. म्हणूनच त्या मानवजातीला संपूर्ण स्वातंत्र्यात आयुष्य जगता यावे यासाठी सर्वांनी सतत प्रयत्नशील असणे महत्त्वाचे आहे.' अशा आशयाचे त्यांचे विचार त्या समाधीवर कोरले आहेत.

विल्यम रॅन्डॉल्फ हर्स्ट हा सॅन फ्रान्सिस्को येथील वृत्तपत्र चालवणाऱ्या धनिकाचा मुलगा. वडिलांची सॅन सिमिओन, कॅलिफोर्निया येथे अनेक एकर जमीन होती. तेथे दहा वर्षाचा असल्यापासून विल्यम आईबरोबर येत असे. तिच्याच बरोबर युरोपातील अनेक देशातील राजवाडे पाहण्याची संधी त्याला लहान वयात मिळाली. पुढे मोठा झाल्यावर वडिलोपार्जित वृत्तपत्र व्यवसाय त्याचेकडे आला व तो त्याने यशस्वीपणे चालवला. आज लोकप्रिय असणारी अनेक वृत्तपत्रे, मासिके त्याने त्या काळात चालू केली. १०० चित्रपटांची निर्मिती केली. मात्र सॅन सिमिओनमधील ही जमीन त्याला त्याच्या ५० व्या वर्षी मिळाली. त्यानंतर त्याच्या स्वप्नपूर्तीला खरी सुरूवात झाली. सॅन फ्रान्सिस्को येथील महिला आर्किटेक्ट ज्युलिया मॉर्गन हिला हाताशी घेऊन युरोपातील राजवाड्यांप्रमाणेच भव्य आणि सुंदर राजवाडा बांधण्याचे स्वप्न पुरे करण्यास त्याने सुरूवात केली व अनेक कठिण प्रसंगांना तोंड देत ते स्वप्न पुरे केले. 'हर्स्ट कॅसल' या नावाने ही वास्तु आता ओळखली जाते. युरोपातील फ्रेंच, स्पॅनिश, इटालियन वास्तुशास्त्राचे उत्तमोत्तम नमुने या वास्तुत पाहण्यास मिळतात.

या दोन्ही ठिकाणचे हवामान भारतातील हवामानाला जवळचे असल्याने या ठिकाणांना भेटी देताना मला राहून राहून घरची आठवण येत होती व आपण असे भव्य-दिव्य का करू शकत नाही याबद्दल विषाद वाटत होता. येथील प्रत्येक डोंगर मला कोकणातल्या डोंगरांसारखा दिसतो. तेथील सृष्टीसौंदर्य तेवढेच सुंदर आहे. अभाव आहे जिद्दीचा. स्वप्न उराशी बाळगण्याचा. रेगनचे उत्तम संग्रहालय आहे तसे पंडित नेहरूंचे कां नाही, कोल्हापूरचा पन्हाळा इतका सुंदर का ठेवता येत नाही? (जयपूरच्या किल्ल्यांच्या भोवतालची अस्वच्छता काय वर्णावी!). भारतीयांच्या मानसिकतेत हळू हळू बदल होत आहे. त्यामुळे आशेला थोडी जागा आहे.

तरूणांपासून वृद्धांपर्यंत सर्व वयाच्या लोकांना कॅलिफोर्नियाचे आकर्षण वेगवेगळ्या कारणांनी असते. या दोन दिग्गजांचा जीवनाकडे पाहण्याचा आशावाद व आयुष्याच्या शेवटापर्यंत कार्यमग्न राहण्याची तळमळ मला नेहमी आकर्षित करते. त्यात कॅलिफोर्नियातील मराठी मित्रमंडळींबरोबर गप्पा मारण्यातील आनंदाची व जोडीला त्यांच्या दारच्या आंबे, पेरू, अंजीर, पेअर, संत्री, खजूर, केळी, लिंबे, ऊस अशा फळांची तसेच मोगरा, गुलाब, जास्वंद, कण्हेर अशा फुलांची भर पडते व माझे शरीर आणि मन पूर्व किनाऱ्यावर पुढील सहा महिने बदलणाऱ्या हवेशी मुकाबला करण्यास सिद्ध होते.

**मोहन रानडे**
*editorbmm@yahoo.com*

बृहन्महाराष्ट्र वृत्त

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408
*Or call 1-800-300-6430 to pay by credit card. Master Card, Visa, American Express and Discover is accepted.*

**INSURANCE & REAL ESTATE**

**HEALTH INSURANCE FOR VISITORS FROM ABROAD**
Reasonable Rates. Administering this program for more than 15 years.

**LIFE INSURANCE**
Lowest rates in USA. Reputable carriers

**REAL ESTATE**
Hotels/Motels, Businesses

**Administering this program for more than 25 years**

**Contact: Shashi Thakur, Ph.D.**
Tel: (901)854-9451 Fax : (901)853-4809
Cell: (901)230-3209
E-mail: sjthakur@bellsouth.net

**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

*** VISITORS**
*** H-1 B VISA HOLDERS**
*** PERMANENT RESIDENTS**
**( Some restrictions apply)**

**For more information:**
**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**
**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: (800)204-1939
Fax : (706)860-7268
E-mail: padmajabapat@yahoo.com
Website: visitors-insurance.com